ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# भारतातील महिलांचे आर्थिक सबलीकरण

**प्रा. चंद्रशेखर फरकाडे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग)
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, नागपूर.

**प्रस्तावना :-**

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान आहे. आजही कुटुंबात आणि समाजात स्त्रीला दुय्यम स्थान दिल्या जाते. आजच्या काळातही स्त्रीला जन्मानंतर पित्यावर, विवाहानंतर पतिवर आणि वृध्दापकाळात मुलावर अवलंबून राहावे लागते. आज काही प्रमाणात स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळत असली तरी त्याचे प्रमाण फार अल्प आहे.

महिला सबलीकरण ही काळाची गरज आहे, परिस्थितीनुरुप सर्व क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहे. या बदलानुसार जागतिक पातळीवर चर्चा होत आहे. महिला सबलीकरणासाठी विविध कार्यक्रम व ध्येय धोरणे राबवले जात आहेत. त्यातून महिला विकासाचा तसेच महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, वैचारिक, कौटुंबिक, व्यावसायिक व सांस्कृतिक अशा विविध घटकांचा विचार केला जात आहे. विश्वातील अर्धी मानवी शक्ती स्त्री आहे, ती शक्ती देशाच्या विकासासाठी महत्वाची असल्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. खरे तर महिलांमध्ये आत्मविश्वास व साहस निर्माण करणे हा महिला सबलीकरणाचा मुख्य हेतू होय. म्हणून इ.स. 1975 हे वर्श 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून साजरे केले गेले. तसेच भारतानेही 2001 हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष जाहीर करुन महिलांबाबत वेगवेगळ्याा योजना आखल्या, त्यातूनच महिलांचे जीवनामान व दर्जा कसा उंचावता येईल व त्यांची सर्व क्षेत्रात प्रगती कशी साधता येईल याचा सर्वंकश विचार करण्यात आला.

महिला सबलीकरणाचा जागर आज थेट ग्रामीण भागात पोहचला आहे. भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा वाढवून त्यांच्या सबलीकरणाची प्रक्रिया निर्माण करण्याचे कार्य सर्वप्रथम भारतीय सामाजिक विचारवंतांनी केले. आपल्या वैचारिक प्रबोधनातून तसेच प्रत्यक्ष कृतीतून महिला सबलीकरणाला सुरुवात झाली. एवढे सर्व असतांना देखील समाजातील बुरसटलेल्या रुढी, पंरपरा, अंधश्रध्दा, निरक्षरता व धर्माधंता यामुळे स्त्रिया दबलेल्या अवस्थेत जीवन जगत आहे. आज ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, अवकाश, संशोधन, अर्थाजन अशा पायऱ्या चढत तिने अंतराळात झेप घेतली आहे. असे असले तरी आजही स्त्रीचे 'सती' जाणे सुरु आहे. फक्त त्याचे स्वरुप, संदर्भ व परिस्थिती बदलेली आहे. स्त्रियांचे योगदान हे कुटूंबापासून ते देशसेवेपर्यंत आहे. या दृष्टिने स्त्रियांची स्थिती व समस्या यावर वैचारिक मंथन होणे गरजेचे आहे. महिला सबलीकरण हा फक्त चर्चेचा विशय न ठरता त्याला कृतीची जोड मिळाली पाहिजे.

**संशोधन लेखाचा उद्देश :-**

सदर संशोधन लेखाचा उद्देश हा आहे की, भारतातील महिलांची स्थितीचा अभ्यास करुन त्या अंतर्गत भारतातील महिलांचे आर्थिक सबलीकरण जाणून घेणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला असुन त्यात प्रकाशित व अप्रकाशित पुस्तके तसेच संकेतस्थळे इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

**भारतातील महिलांची स्थिती :-**

जगातील 1 अब्ज साक्षर लोकांमागे 67 टक्के स्त्रिया निरक्षर तर सर्व देशांच्या संसदेत प्रमाण फक्त 11 टक्के आहे. भारतातील

स्त्रियांची स्थिती पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

**1) स्त्रियांची साक्षरता :-**

| वर्ष | स्त्रियांची संख्या |
|---|---|
| 1951 | 8.16 टक्के |
| 1961 | 15.35 टक्के |
| 1971 | 21.97 टक्के |
| 1981 | 29.76 टक्के |
| 1991 | 39.29 टक्के |
| 2001 | 54.16 टक्के |
| 2011 | 63.27 टक्के |

वरील आकडेवारीवरुन 'स्त्री साक्षरता' प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत असले तरी स्त्रियांची साक्षरता वाढविण्यास भरपूर वाव मिळत आहे.

**2) स्त्रियावरील अत्याचार :-**

| | | |
|---|---|---|
| 1. | हुंडाबळी | 4,935 |
| 2. | बलात्कार | 12,351 |
| 3. | पळवून नेणे | 12,997 |
| 4. | मुलींना त्रास देणे | 10,496 |
| 5. | मुलींचा छळ करणे | 24,117 |
| 6. | तीव्र वेदना पोहचविणे | 25,946 |

**3) भारतातील स्त्रियावर होणाऱ्या अत्याचाराच्या हिशेबाने वर्णन केल्यास ते पुढीलप्रमाणे करता येईल.**

| | | |
|---|---|---|
| 1. | दर 27 मिनिटे | 1 विनयभंग |
| 2. | दर 22 मिनिटे | 1 स्त्री क्रुर वर्तन |
| 3. | दर 43 मिनिटे | 1 अपहरण |
| 4. | दर 54 मिनिटे | 1 बलात्कार |
| 5. | दर दोन तास | 1 हुंडाबळी |

यावरुन महिला सबलीकरणाची गरज आहे हे स्पश्ट होते.

**महिला सबलीकरण म्हणजे काय? :-**

महिला सबलीकरण या शब्दाची फोड केल्यास सबलीकरण म्हणजेच दुर्बलता नष्ट करणारी संकल्पना. ही संकल्पना नवीन नाही. परंतू आज ही संकल्पना गतिमान बनली आहे. महिला सबलीकरण म्हणजे स्त्री पुरुष समानतेचा स्वीकार करणे, स्त्रीयांना पुरुषाांच्या बरोबरीने विकासाची संधी देणे, तिच्यात स्वत्वाची जाणीव निर्माण करणे. सर्व क्षेत्रांत विकास करण्यासाठी संधी उपलब्ध करुन देणे.

पावलो फिरे यांनी सर्वप्रथम 'महिला सबलीकरण' ही संकल्पना मांडली. ही संकल्पना स्त्रियांच्या विकासाशी संबंधित आहे. अबला महिलांना सबला करणे आणि त्यांना समान हक्क व समान संधी देणे हाच या संकल्पने मागचा उद्देश आहे.

**महिला सबलीकरण व शासनाची भुमिका :-**

ज्या संस्कृतीने ज्या देशाने महिलांच्या सबलीकरणाचा मार्ग चोखळता त्या संस्कृतीने त्या देशाने सर्वांगिण प्रगती साधली लोकसंख्येमध्ये जवळपास 50 टक्के महिला असताना त्यांच्या उत्कर्षाशिवाय कुटुंबाची, गावाची, राज्याची आणि पर्यायाने देशाची प्रगती होणे कठीण आहे. हे ओळखुन महाराष्ट्र शासनाने व तत्कालिन मुख्यमंत्री शरद पवार यांनी 1994 साली खास महिला सक्षमीकरण व सबलीकरणासाठी महिला धोरण आखल्याने महाराष्ट्र राज्य देशातील पहिले राज्य ठरले आणि कालांतराने अशा महिला धोरणाचा राष्ट्रीय स्तरावर देखील स्वीकार झाला. गेल्या सोळा वर्षाहून जास्त काळ राज्यात या महिला धोरणाची यशस्वीरित्या अंमजबजावणी होताना दिसून येते. तसेच केंद्र शासनाने महिला सबलीकरणासाठी 21 व्या शतकाची नांदी म्हणून 1 एप्रिल 1999 पासून सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार ही महत्वकांक्षी योजना सुरु केली. स्वयंसहाय्यता बचतगट या योजनेचा आत्मा आहे. तसेच बचत गटाचे महत्व ओळखून चार टक्के व्याजदराचे अर्थसहाय्य दोन लाख स्वयंसहाय्यता बचतगटांना मिळणार आहे. म्हणजे 20 लाख लाभार्थींना पारदर्शी कर्ज फेडणाऱ्या 50 हजारापासून ते 1 लाखपर्यंत परत कर्ज फेड केलेल्या बचत गटांना परत दोन लाखापर्यंत कर्ज मिळेल अशी अंदाजपत्रकीय तरतुद शासनाने केलेली आहे.

**महिला आर्थिक सबलीकरण :-**

अर्थशास्त्रज्ञ श्री. अमर्त्य सेन यांनी असे म्हटले आहे की, ''स्त्रियांना नेहमीच ज्याचा मोबदला मिळत नाही असे श्रम करावे लागले आहेत. श्रमाच्या या विभागणीमुळे स्त्रियांचे संघटित होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे साहजिकच त्यांचा आर्थिक विकास झालेली नाही. रोजगाराच्या संघटित व असंघटित क्षेत्रात महिलांना किती संधी दिली गेली आहे, यावरुन रोजगाराच्या क्षेत्रात महिलांची प्रगती लक्षात येते.'' हे त्यांचे विवेचन महत्वाचे आहे, परंतू सद्यःपरिस्थितीचा जर अभ्यास केला तर असे आढळून येईल की स्त्री शिकली, कमावती झाली म्हणजेच तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळतेच असे नाही. स्त्रीने नोकरी करुन पैसा कमावला तरी बरेचदा तो सर्व पैसा पतीच्या ताब्यात दिला जातो व त्यातून पती घरखर्च व इतर खर्च करतो. काही उच्चभ्रू कुटुंबातून परिस्थितीत परिवर्तन होत असले तरी अजूनही महत्वाचे आर्थिक निर्णय पतीच घेतो.

आज लिंग समानता या मुद्याने देशाच्या राजकारणात प्रमुख स्थान प्राप्त केले आहे. देशाने सर्वांगिण विकासाचे लक्ष्य 2030 ठेवले आहे. महिला व बालविकास मंत्रालय सातत्याने महिला सबलीकरणावर लक्ष केंद्रित करून आहे. या अंतर्गत 'लिंग समानता प्रस्थापीत करा व सर्व महिलांना सशक्त बनवा' हा नारा दिला आहे. लिंग असमानता यामुळे बऱ्याच महिला विकासाच्या प्रवाहापासून दूर आहेतदेशातील श्रमीक महिलांची संख्या 12.72 कोटी असून ती एकूण महिलांच्या (49.6 कोटी) 25 टक्के असल्याची माहिती कामगार मंत्रालयाकडून देण्यात आली आहे. बहूसंख्य श्रमिक महिला ग्रामीण भागात आहेत त्यापैकी 87 टक्के महिला शेतमजूर किंवा शेतीसंबंधीत कामे करतात. शहरातील 80 टक्के श्रमीक महिला असंघटित क्षेत्रात आहेत. वीज, गॅस, जलक्षेत्र, कारखाने अशा अनेक क्षेत्रात महिलांचे प्रमाण फारच कमी आहे. काही महिलांना रोजगार मिळाला असला तरी वेतन दर्जा, कामाची स्थिती यामध्ये पुरूशांच्या तुलनेत त्या पिछाडीवर असल्याचे दिसून येते. श्रमीक महिलांच्या शक्तीच्या उपयोगातून संपत्ती निर्माण होत असली तरी त्यांच्या जीवनमानात अद्याप फारसा गुणात्मक फरक पडलेला दिसून येत नाही

महिलांना या आर्थिकदृश्टया स्वतंत्र व स्वावलंबी झाल्या तर त्यांचे आर्थिक सबलीकरण झाले असे म्हणता येईल. गेल्या काही वर्षांमध्ये औपचारिक व अनौपचारिक कामांमधील महिलांचा सहभाग वाढला आहे. जागतिकीकरणामुळे व बदलत्या आर्थिक संरचनेमुळे महिलांचे उत्पन्न आवश्यक होत आहे.

''समाज जागृतीसाठी स्त्री जागृती आवश्यक आहे. स्त्रीसमूह जागृत झाल्यास संपूर्ण राश्ट्रात जागृती निर्माण होईल.'' असे पं. जवाहरलाल नेहरु यांनी म्हटले आहे. स्त्री हा समाजातील अतिशय महत्वपूर्ण घटक आहे. स्त्रियांच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून असतो. ज्या देशात स्त्रियांच्या विकासाकडे दुर्लक्ष केले जाते, त्यांच्या मूलभूत, अंगभूत गुणांचा विकास होऊ दिला जात नाही त्या देशाला काहीही भवितव्य नसते. स्त्रियांच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्य, रोजगार, सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय अधिकार देणे आवश्यक आहे.

महिलांचे भारतीय अर्थव्यवस्थेमधील सहभागाचे निर्देशक हे त्याचा विविध कामांच्या क्षेत्रांमधील सहभाग, त्यांना सोपवलेल्या कामाचा दर्जा व त्यांचे स्थूल उत्पादनामधील (Gross Domestic Product - GDP) योगदान यावर अवलंबून असते. राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम (National Skill Development Program - NSDP) च्या अंतर्गत महिलांकरिता 231 विविध कौशल्य शिकवले जातात, ज्यामुळे त्या अर्थिक दृष्टीने स्वावलंबी होऊ शकतात. यामध्ये काळानुसार बदल विकास कार्यक्रम व राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम हे दोन्ही एकत्रितपणे कार्य केल्यास बदलत्या काळानुसार त्यांना नोकऱ्यांमध्ये संधी मिळेल. अर्थव्यवस्थेमध्ये महिलांचा अंतर्भाव करुन घेण्याकरिता आणखी एक बाब महत्वपूर्ण ठरली, ती म्हणजे मायक्रो फायनान्स होय. त्यामुळे स्वयंसाहाय्यता गटांना दुहेरी फायदा झाला. त्यांची बँकांमध्ये बचत झाली व कर्ज मिळण्याची सोयदेखील झाली. त्यामुळे कमी उत्पन्न गटातील महिला मोठ्या प्रमाणात आर्थिक दृश्टीने स्वावलंबी झाल्या. मार्च 2010 पर्यंत 69.53 लाख बचत गट हे नाबार्ड व SHG -(Bank Linkage Programme) च्या अंतर्गत नोंदणीकृत झाले आहेत. यापैकी 76ः बचत गट केवळ महिलांचे आहेत. 72.5ः यांची बचत बँकेमध्ये आहे व 82ः यांनी कर्जाचा लाभ घेतलेला आहे.

**समारोप :-**

जागतिकीकरणाच्या या युगात महिलांच्या संदर्भात असणारी 'चुल व मुल' ही संकल्पना आता कालबाह्य झालेली आहे. त्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र व स्वावलंबी झाल्या असून औपचारिक व

अनौपचारिक कामांमधील महिलांचा सहभाग वाढला आहे. आज संपूर्ण जगालाच जास्तीत जास्त महिला नेतृत्वाची गरज निर्माण झाली आहे कारण सध्या संपूर्ण जग एका विशिष्ट आव्हानात्मक अशा स्थित्यंतरातून जात आहे. महिलांचे नेतृत्व म्हणजे मोठ्या संख्येने महिला पुढारी तयार होणे, असा अर्थ अभिप्रेत नाही. तर व्यापक अर्थाने सर्वांगिक विकासाचा समतोल राखण्याचे आव्हान पेलू शकेल अशा, महिला सापेक्ष नेतृत्वाची आज खऱ्या अर्थाने सर्व जगालाच गरज आहे.

**संदर्भसुची :-**

1. प्रा. देशपांडे. एस्. एस्.- मानवी हक्क, चेतन बुक्स, पुणे, 2014.
2. डॉ. महाजन वंदना - स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन, अथर्व पब्लिकेशन्स्, धुळे, 2013.
3. डॉ. मंदाकिनी गीताली- स्त्रीप्रश्न सोडवताना...,दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., पुणे, 2009.
4. ॲड. देशमुख अरुण- मानवी हक्क आयोगा, मनोरमा प्रकाशन, मुंबई, 2010.
5. डॉ. गुप्ता सुरेश- सक्षम स्त्री आरोग्य आणि कायदा, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर, 2002
6. महिलांचे हक्क व अधिकार - 2001
7. योजना मासिक सप्टेंबर 2016